# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण १६, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | सहकार मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री | |
| (३) | वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री | |
| (४) | आदिवासी विकास मंत्री | |
| (५) | कृषी मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ११**

---

### तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ (ओ.एन.जी.सी.) मुंबई या कंपनीमार्फत करण्यात येत असलेल्या सेस्मिक सर्वेक्षणाबाबत

**(१) * ७३६६५ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेल आणि नैसर्गिक वायू महामंडळ (ओ.एन.जी.सी.) मुंबई या कंपनीमार्फत करण्यात येत असलेल्या सेस्मिक सर्वेक्षणामुळे मच्छिमारांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छिमारांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याबाबतचे सर्वसमावेशक धोरण ठरविण्यासंदर्भात शासनाने ओ.एन.जी.सी.ला दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्थेने (C.M.F.R.I.) या प्रकरणी सर्वेक्षण करुन अहवाल ओ.एन.जी.सी. कंपनीला माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
ओ.एन.जी.सी. कंपनीला सर्व समावेशक धोरण ठरविण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(३) केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्थेने ओ.एन.जी.सी.कंपनीला अहवाल सादर केला असल्याचे, C.M.F.R.I. ने कळविले आहे.
(४) ओ.एन.जी.सी.व केंद्रीय सागरी मत्स्य संशोधन संस्थेला, आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन धोरण निश्चित करणेबाबत निर्देशित केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तारापूर अणुऊर्जा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाले नसल्याबाबत**

**(२) * ७६००२ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री. श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर अणुऊर्जा प्रकल्पाकरिता पोफरण व अक्करपट्टी या दोन गावातील शेकडो ग्रामस्थांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अणुऊर्जा प्रकल्प ३ व ४ करिता सदरहू दोन गावे उठविण्यात आली होती, त्यातील काही कुटुंबियांचे दहिसरतर्फे तारापूरमध्ये पुनर्वसन करण्यात आले, परंतु उर्वरित ५८३ कुटुंबियांचे दहा वर्षे उलटूनही अद्याप पुनर्वसन करण्यात आलेले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन झाले आहे ती घरे निकृष्ट दर्जाची असून तेथे अनेक गैरसोयी आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या, प्रकल्पग्रस्त असल्याचे म्हणून दाखले, मच्छीमार कुटुंबांना समुद्रकिनाऱ्यालगत जागा, आवश्यक तो पाणीपुरवठा, ५८३ कुटुंबाचे पुनर्वसन तसेच आवश्यक असलेल्या सोयीसुविधा पुरविणे आदि मागण्यांसंदर्भात वेळोवेळी निवेदने व आंदोलने करुनही अद्यापही यासंदर्भात शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही, नवीन पुनर्वसित गावाच्या ठिकाणी अक्करपट्टी गावातील ५१७ व पोफरण गावातील ७३३ प्रकल्पग्रस्तांसाठी एकूण १२५० घरे बांधण्यात आली असून १२५० पैकी १२४७ प्रकल्पग्रस्तांनी घराचा ताबा घेतला आहे. उर्वरीत ०३ प्रकल्पग्रस्तांचा ठावठिकाणा सापडत नाही. तारापूर अणुऊर्जा प्रकल्पग्रस्तांची १२५० इतकी संख्या मा. उच्च न्यायालयाचे आदेशान्वये निश्चित करण्यात आली असून रिट याचिका क्र. ५६६३/२००४ मधील आदेशानुसार १२५० प्रकल्पबाधित खातेदारांना घरासाठी भूखंड वाटप करण्यात आले आहेत.
(३) सदर प्रकल्पग्रस्तांना विशेष बाब म्हणून NPCIL यांचेमार्फत घरांचे बांधकाम करून देण्यात आलेले आहे. ही सुस्थितीतील घरे सन २००६ पासून प्रकल्पग्रस्तांना टप्याटप्याने वाटप करण्यात आली आहेत. तथापि, बहुतांश प्रकल्पग्रस्त तेथे राहावयास गेले नसल्याने देखभाली अभावी त्यांच्या घरांची काही प्रमाणात दुरावस्था झाली. सदर

बाब जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दिनांक १५.०१.२०१२ रोजीच्या अहवालान्वये NPCIL यांना कळविण्यात आली आहे. तथापि NPCIL यांनी याअनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे चालु असलेल्या रिट याचिकांमध्ये दिनांक १०.०१.२०१३ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करून प्रकल्पग्रस्तांना पूर्वीच वाटप केलेल्या घरांची दुरूस्ती करता येणार नसल्याचे मा.उच्च न्यायालयास सांगितले आहे.

(४) प्रकल्पग्रस्त कुटुंबातील व्यक्तीस कायमस्वरूपी नोकरी पुरविणे हा मुद्दा न्युक्लियर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडीया लि. (NPCIL) शी संबंधित आहे. अद्यापपर्यंत ६९१ प्रकल्पग्रस्तांना जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत दाखले देण्यात आले आहे. प्रकल्पग्रस्त मच्छिमारांनी मा. उच्च न्यायालयात केलेल्या मागणीनुसार बोटी व इतर साहित्य ठेवण्यासाठी मौजे उनभाट येथे जमीन निहीत केली आहे. तसेच दोन्ही गावांना १८ नागरी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर व सांगली जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(३) * ७३५०९ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात कर्ज वसुलीच्या जाचाला कंटाळून वर्षभरात १४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी केवळ चार शेतकऱ्यांना जिल्हा प्रशासनाकडून प्रत्येकी एक लाख रुपयांची मदत मिळाली तर सहा शेतकऱ्यांचे अर्ज अपात्र केले असून उर्वरीत ४ अर्जाची फेरचौकशी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सोलापूर जिल्ह्यात आजपर्यंत आत्महत्या केलेल्या ३३३ शेतकऱ्यांपैकी केवळ १०१ शेतकऱ्यांच्या कुटुंबियांनाच मदत मिळाली असून इतर अर्ज नाकारले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे सांगली जिल्ह्यामध्ये सावकारीचा परवाना नसताना बेकायदेशीरपणे हा गैरकारभार केला जात असून खाजगी सावकारीची प्रकरणे मोठ्या प्रमाणात होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यामध्ये अतिरिक्त व्याजाची आकारणी करुन घर, जमिनी व इतर ऐवज बळकावल्या जात असून कोऱ्या स्टॅम्प पेपरवर सह्या करुन घेण्याचे प्रकारही निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त जिल्ह्यातील सर्व आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करुन त्यांना बँकेच्या वा सावकारी कर्जातुन मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१), (२) व (३) खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यात सन २०२२-२३ या वर्षात एकूण १६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची प्रकरणे जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्या कार्यालयास प्राप्त झाली आहेत. त्यापैकी जिल्हा प्रशासनाकडून प्रत्येकी रु.१.० लाख रुपयांची मदत मिळण्यासंदर्भातील ४ प्रकरणे पात्र ठरली असून ७ प्रकरणे अपात्र ठरली आहेत. उर्वरित ५ प्रकरणांवर जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून फेरचौकशी सुरु आहे.

सोलापूर जिल्ह्यात सन २०२२-२३ तसेच माहे सप्टेंबर २०२३ मध्ये वा त्यादरम्यान सावकारामार्फत दिलेल्या कर्ज वसूलीच्या जाचाला कंटाळून शेतक-यांनी आत्महत्या केल्याची कोणतीही तक्रार जिल्हा उपनिबंधक तसेच सहायक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयात प्राप्त झालेली नाही.

सोलापूर जिल्ह्यात सन २००१ ते माहे सप्टेंबर २०२३ अखेर एकूण ३५५ शेतक-यांनी आत्महत्या केल्याची प्रकरणे नोंद झाली आहेत. त्यापैकी १९९ प्रकरणांमध्ये शेतक-यांच्या कुटुंबियांना मदत मिळाली आहे. तसेच उर्वरित एकुण २२६ प्रकरणे हे शासन निर्णयात दिलेल्या तरतुदीमध्ये बसत नसल्याने जिल्हास्तरीय समिती मार्फत अपात्र करण्यात आली आहेत.

(४) व (५) अशंत: खरे आहे.

माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये एका प्रकरणात प्राप्त तक्रार अर्जावर सहायक निबंधक, सहकारी संस्था, विटा, जि. सांगली यांचेकडे सुनावणी सुरु आहे.

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील कलम १६ अन्वये कारवाई केलेल्या प्रकरणांपैकी जत तालुक्यामध्ये बेकायदेशीर बाब आढळून आल्याने संबंधितावर पोलीस ठाणे, उमदी येथे दिनांक २०/०५/२०१८ रोजी गुन्हा क्र.००९१ दाखल होऊन अटक झाली आहे.

आतापर्यंत अशा प्रकारच्या एकूण ५ प्रकरणांमध्ये महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम १८ (२) मधील तरतुदीनुसार एकूण ४ हे. २४ आर शेतजमीन / मालमत्ता परत करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली यांनी आदेश दिले आहेत.

(६) मदत व पुनर्वसन विभागाकडुन शासनाच्या प्रचलित धोरणानुसार पात्र शेतक-यांना रु. १.० लाख इतकी मदत मयताच्या वारसांना देण्यात येते.

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अमलात आल्यापासुन सांगली जिल्ह्यात सावकारी प्रकरणात आत्महत्या केल्याची प्रकरणे आढळुन आली नाहीत.

तसेच अवैध सावकारी विरुद्ध कारवाई करण्यासंदर्भात शासनाने दिनांक ०१.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय समिती गठीत केली आहे. सदर समितीची वेळोवेळी आढावा बैठक घेऊन त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## चंद्रपूर येथे शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळातर्फे विविध योजनांच्या माध्यमांतून झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(४) * ७२२९८ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथे शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळातर्फे विविध योजनेंतर्गत लाभार्थ्यांना दिलेल्या कर्ज परताव्याच्या रक्कमा महामंडळाच्या खात्यात जमा न करता सदर रक्कमांचा अपहार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्ज वसुली करणारे श्री.किरण चव्हाण, लेखापाल यांनी कर्ज परताव्याच्या रक्कमेची पावती लाभार्थ्यानी दिली, परंतु जवळजवळ वर्षभर वसुल केलेले लाखो रुपये महामंडळांच्या खात्यात जमा केलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची तक्रार नाशिक येथील शबरी आदिवासी वित्त विकास महामंडळाने मुख्य कार्यालयाला करुन देखील यासंदर्भात अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) नाही.
(४) श्री.किरण चव्हाण, लेखापाल यांनी अपहार केलेल्या एकूण रु.४,७०,५६६/- इतका शासकीय निधी त्यांच्याकडून वसूल करण्यात आला आहे. तसेच त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.नाशिक यांच्यामार्फत विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धाराशिव जिल्हा कचेरीतील अभिलेख कक्षातून बनावट अभिलेखे तयार केल्याबाबत

**(५) * ७१८२९ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव जिल्हा कचेरीत कुळ, सिलिंग तसेच इनाम कार्यासनाच्या संचिका बनावट कागदपत्रांच्या आधारे तयार करून घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत बनावट नकलांच्या आधारे शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

जिल्हाधिकारी, धाराशिव कार्यालयातील अभिलेख कक्षातुन बनावट अभिलेखे तयार करुन व प्रमाणीत करुन देणेबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करणेसाठी उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन यांचे अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. उक्त समितीने अहवाल सादर केला असुन उक्त अहवालानुसार प्राप्त तक्रारीत नमुद असलेल्या संचिका बनावट असल्याचे नमुद केले आहे.

उक्त चौकशी समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने सदरील पाच १ सदस्यीय चौकशी समितीचा अहवाल मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद ५ रिट याचिका क्रं.५९०/ २०१९ मध्ये दाखल झाला असुन उक्त अहवालाच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०१.०८.२०२३ रोजी आदेश पारीत केला आहे. उक्त आदेशानुसार प्रकरणात चौकशी करुन गुन्हा नोंद करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. उक्त आदेशाची अंमलबजावणी व कायदेशीर बाबींची पडताळणी व अभ्यास करुन मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार कार्यवाही करण्याचे अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी धाराशिव (उस्मानाबाद) यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या अहवालानुसार या पाच संचिकातील आदेशांच्या प्रमाणित नकला अभिलेख कक्षातून सर्वप्रथम प्राप्त करून घेणारे व्यक्ती यांनी सदर आदेशांच्या नक्कलांचा त्यांना लाभ होण्यासाठी वापर केला असण्याची संभाव्यता असल्याने या व्यक्तीविरुद्ध जिल्हाधिकारी, धाराशिव कार्यालयाचे नायब तहसिलदार यांना गुन्हा नोंद करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले. त्याअनुषंगाने दिनांक २३/०८/२०२३ रोजी

जिल्हाधिकारी, धाराशिव कार्यालयाचे नायब तहसिलदार यांनी पोलीस ठाणे, आनंदनगर, धाराशिव येथे FIR No. ०३३५२०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.
(३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) दिनांक २३.०८.२०२३ रोजी पोलीस ठाणे आनंद नगर, धाराशिव (उस्मानाबाद) येथे FIR No.०३३५ /२०२३ रोजी पाच संचिकातील आदेशांच्या प्रमाणित नकला अभिलेख कक्षातून सर्वप्रथम प्राप्त करून घेणारे व्यक्ती यांचे विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन, प्रकरणात पोलीस तपास चालू आहे. FIR No. ०३३५/२०२३ ची प्रत या समवेत देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) येथील गिरणा मोशन साखर कारखान्यात झालेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(६) * ७२२१५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील गिरणा मोशन साखर कारखान्यात शेअर्सच्या नावाखाली गिरणा मोशन शुगर ॲग्रो एण्ड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून सुमारे १७८ कोटी २५ लाख रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शेतकरी, मजूर व नागरिकांची आर्थिक फसवणूक झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कारखान्याच्या व्यवस्थापन व विश्वस्त मंडळाची चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करणे तसेच फसवणूक झालेल्या नागरिकांची रक्कम परत मिळण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१) (२) व (३) गिरणा मोशन साखर कारखान्यात शेअर्सच्या नावाखाली गिरणा मोशन शुगर ॲग्रो ॲण्ड ॲलाईड इंडस्ट्रोज लि.या कंपनीच्या माध्यमातून सुमारे १७८ कोटी २५ लाख रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाला असलेबाबत कारखान्याचे अव्यवसायकाकडे अथवा प्रादेशिक सहसंचालक (साखर), अहमदनगर कार्यालयाकडे कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्या नसल्याचे साखर आयुक्त, पुणे यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जामनेर (जि.जळगाव) तालुक्यात वादळ व अवकाळी पावसामुळे मेंढ्यांचा झालेला मृत्यू

**(७) * ७२२६४ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जामनेर (जि.जळगाव) तालुक्यात वादळ व अवकाळी पावसामुळे सुमारे साडेपाचशे मेंढ्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मेंढ्यांसाठी कोणतीही स्वतंत्र विमा सुरक्षा योजना अस्तित्वात नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तत्कालीन पशुसंवर्धन मंत्री यांनी मेंढ्यांना विमा कवच देण्यासंबंधी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान बैठक आयोजित केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) माहे मे, २०२३ व त्या दरम्यान जामनेर (जि.जळगाव) तालुक्यात वादळ व अवकाळी पावसामुळे १६८ मेंढ्या व १० शेळयांचा मृत्यू झाला आहे.
(२) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत विमा योजना अस्तित्वात असून केंद्र शासनाकडून निधी वितरीत न झाल्यामुळे सदरील योजनेची अंमलबजावणी होवू शकली नाही.
(३), (४) व (५) राज्यातील पशुधनासाठी स्वतंत्र योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यात अनुसूचीत जमाती व इतर पारंपारीक वननिवासी दाव्यांना अद्यापही मंजुरी मिळाली नसल्याबाबत

**(८) * ७३९२६ श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विविध तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमार्फत दवंडी पिटवून ज्या शेतकऱ्यांच्या मागील तीन-चार पिढ्यांपासून वनजमीनीवर शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या व वहिवाटीखालील जमीनीवर शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह चालत असलेल्या अनुसूचीत जमाती व इतर पारंपारीक वननिवासी दाव्यांना अद्यापही पालघर तालुका वन हक्क कमिटीमार्फत मंजुरी मिळाली नसल्याने पालघर जिल्ह्यातील अनुसूचीत जमाती व इतर पारंपारीक दावेदार असलेल्या हजारो शेतकऱ्यांना त्याचा त्रास सोसावा लागत असल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात अनुसूचित जमाती व इतर पारंपारीक वननिवासी अधिनियमांतर्गत दिनांक १३ डिसेंबर, २०१५ पूर्वी किमान तीन पिढ्यांपासून उपजिवीकेसाठी वन जमिनीवर अवलंबून असलेल्या पारंपारिक आदिवासी दावेदारांचे दावे अमान्य करु नये असे आदिवासी विकास विभागाचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असे असतानाही आदिवासी व इतर शेतकऱ्यांच्या मागील तीन-चार पिढ्यांपासून वनजमीनीवर लागवड केलेल्या व वहिवाटीखालील जमिनीवर उदरनिर्वाह करणाऱ्या नागरिकांच्या वननिवासी दाव्यांना मंजूरी देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पालघर तालुका वन हक्क कमिटीमार्फत अनुसूचीत जमाती व इतर पारंपारिक वननिवासी दाव्यांना अद्यापही मंजुरी मिळाली नसल्याचे दिनांक ७ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२ मध्ये विनिदिष्ट केलेल्या तरतुदींचे तंतोतंत पालन करून वनहक्क दाव्यांची पडताळणी करणेबाबतच्या सूचना आदिवासी विकास विभागाच्या दिनांक ११ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर सूचनांमध्ये (II) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ मधील कलम २ (ण) मध्ये विनिदिष्ट केल्यानुसार दिनांक १३ डिसेंबर, २००५ पूर्वी किमान तीन पिढयांपासून (पिढी याचा अर्थ २५ वर्षाचा कालखंड) वनांत राहणारा आणि उपजिविकेसाठी वनजमिनीवर अवलंबून असणाऱ्या व नियम १३ मध्ये विनिदिष्ट केलेल्या पुराव्यांपैकी किमान २ पुरावे सादर केलेल्या इतर पारंपारिक वन निवासी दावेदारांचे दावे अमान्य करू नयेत, असे नमूद आहे.

(३) व (४) खरे नाही.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम,२००८ तसेच सुधारणा नियम, २०१२ अन्वये पालघर उपविभागस्तरीय वनहक्क समितीकडे ग्रामपंचायतीमार्फत आज रोजी ६५३५ अनुसूचित जमातीचे वनहक्क दावे व १५६ इतर पारंपारिक वनहक्क दावे असे एकूण ६६९१ वनहक्क दावे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ४८६१ वनहक्क दाव्यांची पात्रता निश्चित करून उपविभागस्तरीय वनहक्क समितीने जिल्हास्तरीय समितीकडे मंजूरी करीता पाठविले आहे. त्यापैकी जिल्हास्तरीय वनहक्क समिती, पालघर यांनी ४७२१ वनहक्क दावे मंजूर केले असून उर्वरीत दाव्यांवर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रेणापूर (जि.लातूर) येथे ग्रामरोजगार सेवकांचे मानधन प्रलंबित असल्याबाबत

**(९) * ७५३४६ श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) येथे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कार्यरत ग्रामरोजगार सेवकांचे मानधन प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत विविध कामांची योग्य अंमलबजावणी करुन लाभार्थी व मजूरांना वेळेत लाभ व मजुरी मिळवून देणाऱ्या ग्रामरोजगार सेवकांचे मानधन प्रलंबित असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील अनेक दुर्गम आदिवासी तालुक्यांमध्ये सोयी-सुविधांचा असलेला अभाव**

**(१०) * ७१९९२ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.योगेशदादा कदम (दापोली), श्री.सुनिल भुसारा (विक्रमगड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही तालुक्यात, ग्रामीण व दुर्गम भागातील आदिवासी गाव पाड्यांमध्ये ६८ गावे दळणवळणाच्या सुविधेपासून वंचित असून स्वातंत्र्याला पंच्च्याहात्तर वर्ष होऊनही पक्के रस्ते नसल्यामुळे तसेच अन्य मुलभूत सेवा-सुविधा उपलब्ध नसल्यामुळे तेथील नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होऊन चिखल-मातीतून त्यांना प्रवास करावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट-ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मनोर जवळील खुटल-गुणगुणेपाडा (जि.पालघर) येथील एका आदिवासीचे पार्थिव अंत्यविधीसाठी घेऊन जात असताना तेथे रस्ता नसल्याने जंगलातून न्यावे लागल्याचे दिनांक १८ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील ११० आदिवासी गावांना रस्ते नसून ११० आदिवासी पाड्यांनाही अद्यापी रस्ताच नसल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून येथील बालमृत्यू-मातामृत्यू दर कमी करण्यासाठी गरोदर महिला, माता, अर्भके यांना उपचारासाठी रुग्णालयात नेण्यासाठी व रुग्णालयातून घरी परत येण्यासाठी रुग्णवाहिकेला रस्ताच नसल्यामुळे उपचाराअभावी रुग्णांना जीव गमवावा लागत असून रस्त्यांअभावी या आदिवासी पाड्यांशी संपर्क नसल्यामुळे आरोग्यविषयक सुविधा तेथे पोचविण्यास मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पालघर जिल्ह्यातील नऊ ग्रामीण रुग्णालय व तीन उपजिल्हा रुग्णालयात अपुरा कर्मचारीवर्ग असल्यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसल्याने सर्पदंश व इतर कारणांमुळे अनेक रुग्णांचा मृत्यु होत असून अत्यवस्त रुग्णांना खाजगी रुग्णालये व गुजरातमधील रुग्णालयात घेऊन जावे लागत असून रस्त्याअभावी शहापूर (जि.ठाणे) येथे पटकीचा पाडा येथील एका महिलेची डोंगरातील पायवाटेवरच प्रसूती झाल्याची घटना दिनांक २ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर पटकीचा पाडा येथून सुमारे २५ कि.मी. अंतरावर कसारा प्राथमिक आरोग्य केंद्र असून कसारा ते वेळूक पर्यंत रस्ता असून पटकीचा पाडा ते वेळूक या किमान चार ते पाच कि.मी. अंतराचा रस्ताच नसल्याने पटकीच्या पाड्यातील गंभीर रुग्णांना आरोग्य केंद्रापर्यंत जाण्याकरिता डोलीचा वापर करावा लागतो, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, परिणामी विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी आणि नागरिकांना मुख्य बाजारपेठेत जाण्यासाठी आणि आजारी रुग्णास रुग्णालयात नेण्यासाठी चिखल-मातीतून ७ ते ८ कि.मी. इतके चालावे लागत असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्र दिले आहे तसेच वन विभाग रितसर परवानगी देत नसल्यामुळे रस्त्यांचे प्रस्ताव विभागाकडे वर्षानुवर्ष प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, यासंदर्भात श्रमजीवी संघटनेने तहसील कार्यालयावर अनेकवेळा मोर्चा काढून निवेदन दिलेले असून श्रमजीवी संघटनेने यासंदर्भात संबंधित मंत्री महोदयांना देखील पत्र दिले आहे तथाप, यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार आदिवासी भागातील लोकांना रस्ते, आवश्यक त्या आरोग्य सुविधा व अन्य मूलभूत सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
रुग्णवाहिकेला रस्ता नसल्यामुळे उपचाराअभावी रुग्णांना जीव गमवावा लागल्याची घटना घडलेली नाही.
(४) अंशत: खरे आहे.
(५) व (६) प्राथमिक आरोग्य केंद्र कसारा ते पटकीचापाडा हे अंतर १५.५० कि.मी.आहे. वेळूक ते पटकीचापाडा या ग्रामीण मार्ग क्र. ५४ च्या ३.०० कि.मी. लांबी पैकी २.५० लांबी खाजगी जागेतून असून ०.५० कि.मी. लांबी वन जमीनीतील आहे. वेळूक- पटकीचापाडा रस्त्यासाठी वन विभागाच्या हद्दीतील जागा वन विभागाकडून प्राप्त करण्यासाठी वन जमीन मागणीचा प्रस्ताव पंचायत समिती शहापूर मार्फत वनपरिक्षेत्र अधिकारी, वाशाळा, ता. शहापूर यांना सादर केला आहे.
वेळूक ते पटकीचापाडा दरम्यान पायवाट असून वाशाळा वेळूक-पटकीचापाडा या कामास मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-१ अंतर्गत मान्यता देण्यात आली आहे.
(७) व (८) श्रमजीवी संघटनेने रस्त्यासंदर्भात दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये उपलब्ध निधीनुसार रस्ते/पुल यांची कामे राज्यस्तरावरुन मंजूर करण्यात येतात. जिल्हास्तरावरुन जिल्हा वार्षिक घटक कार्यक्रमांतर्गत गावे/पाडे जोडण्यासाठी रस्त्यांना निधी उपलब्ध करुन दिला जातो. तसेच, आदिवासी उपयोजना क्षेत्रातील मुख्य रस्त्याशी न जोडलेले वाडे/पाडे बारमाही रस्त्याने जोडण्यासाठी शासन निर्णय दिनांक १३/०९/२०२३ अन्वये "भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना" सुरु करण्यात आली आहे.
जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तसेच, वार्षिक सर्वसाधारण योजना अंतर्गत पाणी, आरोग्य, वीज आणि शिक्षण या पायाभूत सुविधांकरीता प्राध्यान्यक्रमाने निधी उपलब्ध करुन देऊन संबंधित यंत्रणेमार्फत कामे करुन घेतली जातात.

-----------------

## राज्यात "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना" व "राज्य रोजगार हमी" योजनेमध्ये होत असलेली अनियमितता

**(११) * ७१९९९ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ‘महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना’ व ‘राज्य रोजगार हमी योजने’ मध्ये सन २०२२-२३ मध्ये १ कोटी ७३ लाख रुपयांचा गैरव्यवहार झालेला असून ९ कोटी ८२ लाख रुपयांची आर्थिक अनियमितता आढळून आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजनेतील गैरव्यवहारास आळा बसावा म्हणून सर्व कामाचे जिओ टॅगिंग केले जात असतानाही या योजनेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात बनावट देयकांच्या आधारे कोषागारातून अपहार करणे, मूल्यांकनापेक्षा अधिक रक्कम दाखवून रकमा काढणे, मस्टर मधील मजूर आणि प्रत्यक्षातील व्यक्ती वेगळे असणे तसेच कनिष्ठ अभियंते व कृषी सहाय्यक यांनी संगनमत करून अपहार करणे आदि तक्रारींचे प्रमाण वाढलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी महालेखाकार यांनीही आक्षेप नोंदविल्याचे दिनांक २३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी ठेकेदार व अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) प्रस्तुत बाब ही कॅगच्या अहवालात आली नसून मगांराग्रारोहयोच्या सामाजिक अंकेक्षण अहवालात निदर्शनात आलेली आहे.

(५) संबंधीत जिल्हयांकडून याबाबतचा अहवाल मागविण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.